**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १० जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी तरुणांची भूमिका महत्त्वाची - युवा कल्याण मंत्री मनसुख मांडवीय यांचं विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ परिषदेत प्रतिपादन.**
2. **नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकितील तीन हजार चार मतदान केंद्रांकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचे वितरण सुरू.**
3. **दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाचे वरिष्ठ मंडळ वाणिज्य प्रबंधक दिलीप सिंह यांना 'अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५' प्रदान.**
4. **विदर्भात थंडीचा कडाका कायम, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात आज पारा 9.4 अंश सेल्सिअस वर.**

-----------------------------------------

विकसित भारत युवा नेता

देशाच्या भविष्याला आकार देण्यासाठी तरुणांची भूमिका महत्त्वाची असते, असं प्रतिपादन युवा कल्याण आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं. विकसित भारत युवा नेता संवाद २०२६ परिषदेचं उद्घाटन मांडवीय यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं झालं, त्यावेळी ते बोलत होते.

***(होल्ड बाईट- मनसुख मांडवीय २० सेकंद)***

***ऐसे हमारे टैलेंटेड युवाओं को आइडेंटिफाइ करना, उसके लीडरशिप के संस्कार को नर्चर करना और उसको लीडर बनाना। दोस्तों विकसित भारत यंग लीडर डाइलॉग ये देश के यंग लीडर तैयार करने के प्रोसेसेस है दोस्तों ये प्रोसेसेस का आप हिस्सा बने हैं, इसलिए मैं आपको अभिनन्दन देता हूँ।***

तंत्रज्ञान, उद्योग, प्रशासन, शाश्वत पर्याय आणि सामाजिक विकास अशा क्षेत्रांमध्ये विविध उपाय सुचवण्यासाठी तरुणांना प्रोत्साहन मिळावं हे या संवादामागचं उद्दिष्ट असल्याचं मांडवीय यांनी सांगितलं. भारतापुढे केवळ देशाच्या सीमा संरक्षित ठेवण्याचंच आव्हान नाही,  तर आर्थिक आघाडीवरही देशाला सज्ज राहावं लागतं, असं मत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे

म्हणून बोलताना व्यक्त केलं. तुम्ही युवा स्वतंत्र भारतात जन्माला आलात हे तुमचं भाग्य आहे, असंही ते म्हणाले.

-----------------------------------------

रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार दोन जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात देशाच्या एकूण परकीय चलनसाठ्यात तब्बल ९ पूर्णांक ८०९ अब्ज डॉलर्सची घट नोंदवली गेली आहे. चलनसाठा ६८६ पूर्णांक ८०१ अब्ज डॉलर्सवर घसरला असून याआधीच्या आठवड्यात चलनसाठ्यात ३ पूर्णांक २९३ अब्ज डॉलर्सची वाढ झाली होती. एका आठवड्यातच हा बदल झाल्यामुळे आर्थिक तज्ज्ञांनीही चिंता व्यक्त केली आहे. जागतिक आर्थिक बाजारातील चढउतार, डॉलरची वाढती मजबुती आणि इतर प्रमुख चलनांतील कमकुवतता यांचा या घसरणीवर थेट परिणाम झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

-----------------------------------------

चंद्रपूर आयुक्त

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त अकनुरी नरेश यांनी चंद्रपूरच्या जनतेला महानगर पालिका निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन केलं आहे -

***(होल्ड बाईट - अकनुरी नरेश १९ सेकंद)***

***येत्या 15 जानेवारी 2026 ला चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक आहे.मी सर्वांना आव्हान करतो की आपण आपला मतदान केंद्रावर जाऊन आपला मत नोंदवाल आणि लोकशाहीमध्ये आपला सहभाग नोंदवा वोट कर चंद्रपूर.***

-----------------------------------------

मतदान केंद्र

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अंतर्गत येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी ३,००४ मतदान केंद्रांकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचे (ईव्हीएम) वितरण सुरू करण्यात आले आहे. दहा झोननिहाय ३ हजारांहून अधिक कंट्रोल युनिट व सुमारे १० हजार बॅलेट युनिट वितरीत करण्यात आले असून, प्रभागानुसार बॅलेट बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडत असून, १० टक्के राखीव ईव्हीएमचीही व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य निवडणूक निरीक्षक डॉ.माधवी खोडे-चवरे यांनी लकडगंज झोनमधील कामाचा आढावा घेतला, तर ईव्हीएमचे वितरण सीताबर्डी येथील बचत भवनातून जीपीएस व पोलिस

बंदोबस्तात करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व सुरक्षित पद्धतीने राबविण्यात आल्याची माहिती नोडल अधिकाऱ्यांनी दिली.

-----------------------------------------

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

नागपूर महानगरपालिका निवडणुकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेस उमेदवारांना (एका जागेचा अपवाद वगळता) जाहीर पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पक्षाचे नेते अरुण लाटकर यांनी दिली. भाजपाच्या सत्ताकाळात विकासाच्या नावाखाली सामान्य नागरिकांचे विस्थापन, प्रदूषणवाढ आणि महापालिकेच्या मालमत्तांचे खासगीकरण झाले, असा आरोप त्यांनी केला.या पार्श्वभूमीवर भाजप व सहयोगी पक्षांना पराभूत करून काँग्रेस उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन पक्षातर्फे करण्यात आले आहे.

-----------------------------------------

सपकाळ

राज्यातील भाजपा-शिंदेसेना-अजित पवार राष्ट्रवादीचे 'ट्रिपल इंजिन सरकार' हे सत्ता उपभोगण्यासाठी एकत्र आले असून त्यांच्यात नैतिकता उरलेली नाही, असा घणाघात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. सत्तेत राहून एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्यांनी आधी राजीनामा द्यावा किंवा एकमेकांचा पाठिंबा मागे घ्यावा, असं आव्हान त्यांनी दिले. पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी शहरातील ड्रग्ज, गुन्हेगारी आणि पायाभूत सुविधांच्या अपयशावरही सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

-----------------------------------------

निलंबन

भारतीय जनता पार्टीनं पक्षाच्या मुंबई आणि नागपूरमधल्या ५८ पदाधिकाऱ्यांना पक्षविरोधी कारवाया आणि बेशिस्त वर्तणुकीबद्दल सहा वर्षांसाठी निलंबित केलं आहे. निलंबित नेत्यांमध्ये माजी महापौर, नगरसेवक आणि प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरुद्ध बंडखोरी करणं, पक्षाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करणं, महायुतीच्या उमेदवारांना सहकार्य न करणं इत्यादी आरोप या पदाधिकाऱ्यांवर आहेत, अशी माहिती भारतीय जनता पक्षाच्या सूत्रांनी आज दिली.

-----------------------------------------

भव्य रॅली

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदानाबाबत जनजागृतीसाठी आज दुपारी ३ वाजता दसरा मैदानातून भव्य रॅली काढण्यात आली. ही रॅली राजापेठ मार्गे राजकमल चौकापर्यंत गेली. विविध सामाजिक, व्यापारी, शैक्षणिक आणि स्वयंसेवी संघटनांचा यात सहभाग होता. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढवून शंभर टक्के मतदान साध्य करण्याचा संकल्प प्रशासनाने व्यक्त केला आहे.

----------------------------------------

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळाचे वरिष्ठ मंडल वाणिज्य प्रबंधक दिलीप सिंह यांना रेल्वे सेवांतील उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण योगदानाबद्दल रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते 'अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला. रेल्वे सुरक्षिततेसाठी त्यांनी विकसित केलेले 'रेल संरक्षा' मोबाईल ॲप देशभर राबवले जात असून अपघात प्रतिबंधात उपयुक्त ठरत आहे. तसेच 'संरक्षा डीएसीएस' ॲपला सर्वोत्तम नवकल्पनेची मान्यता मिळाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली माल लोडिंगमध्ये सुमारे २६ टक्के वाढ तसेच गैर-भाडे उत्पन्नातही लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे.

----------------------------------------

हिंदी दिवस

जागतिक हिंदी दिवस आज साजरा होत आहे. शिक्षण, सांस्कृतिक आदान-प्रदान यासह आंतरराष्ट्रीय स्तरावर हिंदी भाषेच्या वापराला प्रोत्साहन देणं, हे या दिवसाचं उद्दिष्ट आहे. २००६ मध्ये आजच्याच दिवशी नागपूरमध्ये पहिली जागतिक हिंदी परिषद आयोजित करण्यात आली होती. तेव्हापासून, दरवर्षी १० जानेवारी हा दिवस जागतिक हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो.

----------------------------------------

हवामान

विदर्भात थंडीचा कडाका कायम असून आज गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात ९.४ अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाली आहे यवतमाळ इथं ९.८ भंडारा इथं १० अंश सेल्सिअस तर वर्धा आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये १० पूर्णांक ६ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं आहे. येत्या १४ तारखेपर्यंत हवामान मुख्यत्वे कोरडं राहणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

----------------------------------------

मलेशिया सुपर

मलेशिया खुल्या सुपर वन थाउजंड बॅडमिंटन स्पर्धेत भारताचं आव्हान संपुष्टात आलं. महिला एकेरीत दोनवेळा ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिला उपांत्य फेरीत चीनच्या वांग झी यी हिच्याकडून १६-२१, १५-२१ असा पराभव पत्करावा लागला. त्यापूर्वी, पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडीही इंडोनेशियाच्या जोडीकडून पराभूत झाली होती.

-----------------------------------------

चित्रपट महोत्सव

राज्याचा सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि एनएफडीसी यांच्या सहकार्याने मुंबईत आयोजित २२ व्या थर्ड आय आशियायी चित्रपट महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. महोत्सवाचे अध्यक्ष किरण शांताराम यांच्या हस्ते सुप्रसिद्ध दिग्दर्शिका पद्मभुषण सई परांजपे यांना ‘आशियाई चित्रपट संस्कृती पुरस्कार’ आणि दिग्दर्शिका उमा दा कुन्हा यांना ‘सत्यजित रे स्मृती पुरस्कार’ देऊन यावेळी सन्मानित करण्यात आलं. १५ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या सात दिवसांच्या या महोत्सवात विविध आशियाई देशांतील चित्रपट दाखवण्यात येणार आहेत.

-----------------------------------------